जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५७६ दिनांक - २५/०७/२०२३**

मुंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

**"पुणे शहर पोलीस दलाचे वतीने रन फॉर डि-ॲडिक्शन ॲण्ड रन फॉर ऊमन सेफ्टी मॅरेथॉनचे आयोजन... पुणेकर धावणार पुणे शहर पोलीस दलासोबत!!!"**

**पुणेकरांसाठी खुशखबर!... महा-मॅरेथॉनमध्ये मोफत धावण्याची संधी !**

**पुणेकर धावणार पुणे शहर पोलीस दलासोबत!**

शासनाचे उपक्रमा अंतर्गत अंमली पदार्थ डि-ॲडिक्शन व ऊमन सेफ्टी (महिला सुरक्षा) अनुषंगाने समाजामध्ये जनजागृती करणे करीता मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी मॅरेथॉन आयोजित करणे बाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पुणे शहर पोलीस दलाचे वतीने पुणे पोलीस व नागरीकांकरीता ब्ल्यु ब्रिगेड रनिंग क्लब, पुणे कडून दिनांक ०६/०८/२०२३ रोजी सकाळी ०५.३० वा. आयोजन करण्यात आले आहे. मॅरेथॉन आयोजन करीता पंचशिल ग्रुप व पूनित बालन ग्रुप यांनी सहकार्य केले आहे.

सदरची मॅरेथॉन स्पर्धा वेस्टीन हॉटेल, एबीसी रोड, कोरेगावपार्क, मुंढवा, पुणे येथून सुरू होऊन हडपसर मगरपट्टा सिटी येथुन पुन्हा वेस्टीन हॉटेल येथे समारोप होईल. मॅरेथॉनमध्ये सहभाग घेणे करीता रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक असेल. (**Pune Police 10K Run** - Registration Link -https:// www. townscript. com/e/ pune-police-run-10k-243042 ) सदरची रजिस्ट्रेशन लिंक हि ऑनलाईन व व्हॉटस्अप ग्रुपवर शेअर करण्यात आली आहे. सदरचे रजिस्ट्रेशन सर्वांकरीता मोफत आहे, सहभागी स्पर्धक यांना मोफत टि-शर्ट, मेडेल, नाष्टा देण्यात येणार आहे.

रन फॉर डि-ॲडिक्शन ॲण्ड रन फॉर ऊमन सेफ्टी मॅरेथॉनमध्ये पोलीस व नागरिक असे फक्त ७०० स्पर्धक सहभागी होऊ शकतात त्यामुळे लिंक प्राप्त होताच सहभाग निश्चित करावा.

**चला समाज स्वास्थ्यासोबत शरीर स्वास्थ्यासाठी मिळून धावूया!**

**सुरक्षित पुणे व तंदूरुस्त पुणेकर मॅरेथॉनमध्ये सर्व पुणेकर अवश्य सहभागी व्हा !**


RUN FOR.......
DE-ADDICTION
SAY NO TO
DRUGS
Punit Balan
Group
Panchshil
PRESENTS
PUNE
POLICE
RUN
10K
Date - 6th August 2023
Venue - Westin Hotel
Koregaon Park
Powered by
blueBrigade
RUN FOR.........
WOMEN SAFETY
STAND UP
FOR HER!